

# भूकंप आणि वणवा

रस्किन बाँड

अनुवाद : [illegible] दि. सोनटक्के

रु. 12.00

ISBN 978-81-237-3454-5

एकः सूते सकलम्

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

नेहरू बाल पुस्तकालय

# भूकंप आणि वणवा

रस्किन बाँड

अनुवाद

क. दि. सोनटक्के

चित्रे

सुबीर रॉय



नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

ISBN 978-81-237-3454-5

पहिली आवृत्ती : 2001 *(शके 1922)*
दुसरी आवृत्ती : 2004 *(शके 1925)*
तिसरी आवृत्ती : 2009 *(शके 1930)*
चौथी आवृत्ती : 2009 *(शके 1931)*


मूळ © रस्किन बाँड, 1993
मराठी अनुवाद © नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, 2001

Quakes and Flames *(Marathi)*

**रु. 12.00**

संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया
नेहरू भवन, 5 इन्स्टिट्युशनल एरिया
वसंत कुंज, फेज-II, नवी दिल्ली-110 070 यांनी प्रकाशित केले.

# भूकंप



# एक

जेव्हा केव्हा अगदी घाईगर्दीचा प्रसंग गुदरलेला असे तेव्हा तेव्हा आजोबा नेमके त्यांच्या आंघोळीच्या टबभर पाण्यात पहुडलेले असायचे.

रानटी हत्ती धडक मारत आत घुसला, त्याने आजीच्या लाडक्या गुलाबांचे आणि मटारचे वाफे तुडवले, आणि बागेची भिंत पाडली तेव्हा आजोबा आंघोळीतच मग्न होते. चक्रीवादळ होऊन त्यात घराचे छप्परच उडून गेले तेव्हाही ते आंघोळच करत होते. ड्रेसिंग टेबलावर वेटोळे घालून बसलेले अजगराचे पिलू पाहून पाहुणी म्हणून आलेल्या आत्तेने किंचाळत सारे घर डोक्यावर घेतले तेव्हाही ते त्यांच्या आंघोळीच्या टबभर पाण्यातच होते. आणि या प्रत्येक वेळी आपल्याला आंघोळीला लागणाऱ्या वीस मिनिटांच्या अवधीत हे असे काही घडले याबद्दल त्यांनी आश्चर्यच व्यक्त केले. कपडे करून ते बाहेर आले तेव्हा तेव्हा सारे काही शांत झालेलेच होते— रानटी हत्ती चित्कार करत आपल्या आपल्या वाटेने निघून गेला होता. चक्रीवादळ शांत झाले होते. आणि टेबलावरचे अजगराचे पिलू छोट्या राकेशने काढून टाकले होते. मुळात ते त्यानेच तिथे ठेवले होते ही गोष्ट निराळी.

आजोबा आंघोळीकरता जुन्या काळातला टिनचाच टब वापरत. त्यात ऊन पाण्याच्या अनेक बादल्या मावत. त्या टबभर पाण्यात ते पुदिन्याचे शेंडे टाकत. पुदिना आंघोळ ! अशी ही आंघोळ कोणी कधी ऐकलेलीसुद्धा नव्हती. पण ती फार उत्साहवर्धक असते असे आजोबा म्हणत.

आजोबांना आंघोळीच्या वेळी गायची सवय होती. शिवाय ते त्यावेळी पाणीही खूप उडवायचे. म्हणूनच बहुधा त्यावेळी इतरत्र काय चालले आहे हे त्यांना जाणवायचे नाही.

गावचे गाव जमीनदोस्त करणाऱ्या मोठ्या भूकंपाचा पहिला धक्का बसला तेव्हाही ते आंघोळच करत होते.

त्यावेळी बर्मनांचे बहुतेक सारे कुटुंब शिलाँगमध्ये राहात असे. चेरापुंजी डोंगरावर वसलेले शिलाँग त्यावेळी एक छोटेसे, पण खूप वर्दळ असणारे गाव होते. आपली जंगल खात्यातली नोकरी संपल्यावर बर्मन आजोबा तेथेच राहायला आले.



गावाच्या शीवेवर असलेले एक प्रशस्त आणि जुनेपुराणे घर त्यांनी विकत घेतले. ते इतके प्रशस्त आणि इतके जुनेपुराणे होते की त्याची सतत डागडुजी करण्यातच आजोबांचे सारे निवृत्तीवेतन संपून जाई. आणि खर्चाची तोंडमिळवणी करणे आजीला तसे जडच जायचे. जंगल अधिकारी असल्यापासून असलेला मुमताज नावाचा स्वैपाकी सोडला तर घरात नोकरमाणूस नव्हते. मुमताजला स्वतःची चार छोटी मुले होती.

बर्मनांचे नातू आणि नात त्यांच्याजवळच राहात असत. अकरा वर्षांचा राकेश दररोज सकाळी सायकलवरून शाळेला जायचा. सात वर्षांचा झाल्यावरच शाळेला जाईन असा सहा वर्षांच्या मुकेशचा हट्ट होता. तीन वर्षांची डॉली घरात आणि बागेत आजीचे शेपूट बनून कोंबड्यांना आणि कुत्र्याला खायला घालत असे. कुत्रा अर्धा डॅक्-शुंड आणि अर्धा स्पॅनिअल होता. त्याचे नाव होते पिकल. त्याशिवाय त्यांनी एक शेळीही पाळली होती. आज ना उद्या ती आपल्याला दूध देणार अशी आजोबांची खात्री होती — मात्र अजूनपर्यंत तरी तसे काही घडले नव्हते.

डॉलीच्या जन्मावेळी मुलांची आई मरण पावली. बाबा बर्मन शेकडो मैल दूर आणि जवळपास शाळेची सोय नसलेल्या चहाच्या मळ्यावर कामाला होते. साहजिकच मुले आजोबा-आजींकडे राहायला आली. आजोबा-आजींची ती अतिशय लाडकी होती.

भारताच्या या भागात दरवर्षीच भूकंपाचे धक्के बसत. परंतु तीस वर्षांत तरी तिथे खरा मोठा असा भूकंप झाला नव्हता.

''भूकंप होतो तेव्हा आपण काय करायचं असतं ?'' राकेशने विचारले. त्याला आधीच्या भूकंपाबद्दलचे सारे काही ऐकायला मिळाले होते.

''विशेष काही करण्याइतका वेळच नसतो,'' आजोबा म्हणाले. ''सगळेजण घाईघाईनं घराच्या बाहेर पडतात.''

''तो संपेपर्यंत मी आपला शांतपणे माझ्या पलंगावर पडूनच राहीन,'' राकेश म्हणाला.

''मी पलंगाखाली जाऊन लपून बसेन,'' मुकेश म्हणाला. ''त्याला काही मी सापडणार नाही.''

''सगळ्यात चांगलं म्हणजे दारांच्या चौकटीत उभं राहणं,'' आजी म्हणाली. ''भूकंपाचे फोटो पाहिलेत तर त्यात नेहमी दारांच्या चौकटी उभ्याच्या उभ्या शिल्लक राहिलेल्या दिसतात.''

भूकंपाच्या धोक्याच्या पट्ट्यात शिलाँग असले तरी तिथे राहायला सगळ्यांनाच आवडायचे. तेथे एक तलाव आणि गजबजाटी बाजार होता. आणि आजीच्या बागेत फुलपाखरे, पक्षी, आणि विदेशी ऑर्किड यांची गर्दी होती. शिवाय चढायला सोपी आणि गंमत येणारी झाडे— फळझाडे होती. राकेशला सायकलवरून गावभर फेरफटका मारायला आवडायचे. मुकेशला बाजारातली हलवायांची दुकाने आवडायची, म्हणजे मुमताजच्या दोन मुलांबरोबर मातीत कुस्ती खेळत नसेल त्यावेळी. आणि डॉली जिन्याखाली आपल्या बाहुलीचे घर बांधण्यात गुंग असायची.

शिलाँगमधले जीवन तसे संथ होते. रानटी हत्ती आत घुसायचा प्रसंग सोडला तर बर्मनांच्या घरात एवढ्यात खळबळजनक असे काहीच घडले नव्हते. शाळेमध्ये राकेशने उंच उडीत पहिला क्रमांक पटकावला हीच त्यातल्या त्यात खळबळजनक घटना. त्या विजयाबद्दल त्याला एक छोटा पेलाही मिळाला. पण तो इतका छोटा होता की त्याने तो डॉलीला तिच्या बाहुलीच्या घरात ठेवायला दिला.

मग एके दिवशी आजोबा आपल्या आपल्या टबभर पाण्यात पहुडले असताना सारे गाव एकदम चिडीचूप झाले.

# दोन

गाणे गात गात टबातले पाणी उडवण्यात गुंग असल्यामुळे आजोबांच्या काहीच लक्षात आले नाही. पण बागेत गुलाबांची छाटणी करत असणारी आजी एकदम थबकली आणि तिने वर पाहिले. पक्ष्यांचा आवाज एकदम बंद का झाला होता ? फक्त झाडाझुडपांवरच्या पक्ष्यांचाच नाही तर खुराड्यातल्या कोंबड्यांचाही. शेळीने जिरानिअमला कुरतडणे थांबवले होते. आणि भिंतीवरच्या खारीवर भुंकायचे थांबवून कुत्रा पिकल आपले कान मागे घेऊन आणि डोके पुढच्या पायांमध्ये ठेवून निमूटपणे बसला होता.

"म्हणजे हे सगळे किती गमतीशीर आहे, नाही का ?" आजी मोठ्याने म्हणाली. "मला कळत नाही—"

आणि मग एकदम सगळे उलटेच घडले. कोंबड्या कलकलाट करू लागल्या. कुत्री भुंकू लागली. पक्षी पंख फडफडावून चित्कारू लागले. आजुबाजूचे सगळे कावळे जोराने काव काव करत उडताना वेड्यावाकड्या गिरक्या घेऊ लागले. कोंबडीची पिले त्यांच्यामागे कोणी लागले असल्याप्रमाणे पंख फडफडवत चक्राकार धावू लागली. भिंतीवर बसलेल्या दोन मांजरांनी एकदम उड्या मारल्या आणि एकमेकांच्या विरुद्ध दिशेने पळत ती नाहीशी झाली.

भूकंपाच्या आगमनाची चाहूल माणसांपेक्षा प्राण्यांना आधी लागते असे आजीने कुठेतरी वाचले होते. आणि खरोखरच, प्राण्यांचा आक्रोश ऐकून अर्धे-मिनिट झाले असेल नसेल तोच स्वतःकडे वेगाने येणाऱ्या एक्सप्रेस आगगाडीच्या आवाजासारखा खडखडाट आजीच्या कानावर पडला.

साधारण मिनिटभर तो आवाज वाढत गेला. आणि मग जमीन थरथरू लागली. या वेळेपर्यंत प्राणी जणू वेडेपिसे होऊन भीतीदायक आवाज करू लागले होते. झाडांचे शेंडे वेगाने पुढे मागे होत एकमेकांना झोडपू लागले होते. दारे आपटू लागली होती तर खिडक्या थरथरू लागल्या होत्या. आणि आजीने नंतर सांगितल्याप्रमाणे तिच्या दृष्टीसमोर सारेच्या सारे घर लाटेवर

असल्यासारखे हेलकावू लागले. तिला सरळ ताठ उभे राहता येईना. परंतु तिने नंतर सांगितल्याप्रमाणे त्याचे कारण जमिनीच्या कंपापेक्षा तिच्याच पायांना सुटलेला कंप हे होते.

पहिला धक्का साधारण अर्धे मिनिटभरच टिकला. पण तो वाटला कितीतरी अधिक वेळेचा. आजोबा आंघोळीच्या नादात आहेत, राकेश शाळेच्या वाटेवर आहे, मुकेश मुमताजच्या मुलाबरोबर गोट्या खेळतोय, डॉली जिन्याखाली तिच्या बाहुलीचे घर सजवण्यात गुंग आहे, आणि मुमताज स्वैपाकघरात भाज्या धूत आहे हे आजीच्या लक्षात आले. डॉलीला बाहेर आणण्यासाठी ती वेगाने घरात घुसली.

त्याबरोबरच भूकंपाचा गडगडाटी आवाजही वाढला. अजूनही आरामात गात असल्यामुळे आजोबांना तो ऐकू आला नाही. पण आजी आणि डॉलीला तो ऐकू आला. आपले बाहुलीचे घर नाचू लागले आहे हेही डॉलीच्या लक्षात आले. गडगडाटी आवाजाबरोबरच काचसामानाचा थयथयाटही मुमताजच्या कानावर पडला. एक किटली जागेवरून घसरली आणि जमिनीवर पडून तिचे तुकडे तुकडे झाले. बैठकघरातील शेकोटीच्या वरच्या पाळीवर ठेवलेले (आजोबांच्या सांगण्यानुसार तीनशे वर्षांपूर्वीचे ) भांडे उडाले आणि खाली पडून फुटले.

डॉलीला पहिला धक्का जाणवला तेव्हा ती सहजगत्या जिन्याच्या 'विहिरी'त सरकली. आपल्याबरोबर तिने आपली आवडती बाहुलीही ओढली. त्या बाहुलीचे सगळे केस केव्हाच उखडले होते. एक डोळाही बाहेर आला होता. पण ती फार पूर्वीपासून डॉलीजवळ होती आणि म्हणून तिची खास देखभाल करायला हवी असे डॉलीला वाटले. सगळेच्या सगळे घर असे का थरथरू लागले आहे याचे उत्तर तिला माहिती नव्हते. पण ती घाबरली नाही. सगळी घरे अशी अधूनमधून थरथरतातच असे तिला वाटले.

आजीला ती जिन्याखाली दिसली नाही तेव्हा "डॉली, डॉली तू कुठं आहेस," अशा हाका मारत ती बैठकीच्या खोलीत धावली. तिथले भिंतीवरचे घड्याळ वेडेपिसे झाले होते आणि सगळेच एकदम वाजले असल्याप्रमाणे सतत ठण ठण असा आवाज करू लागले होते.

स्वैपाकघरातल्या चिनीमातीच्या प्लेटा, पेले, आणि बशा आपल्या शेल्फमधून एकदम वेड्यासारख्या उडायला लागल्या होत्या आणि मुमताज त्यांना झेलायचा प्रयत्न करू लागला होता. मुकेशने आपल्या सगळ्या गोट्या



गमावल्या— आणि त्याही कोणाशीही खेळत नसताना. त्या फाटकामधून रस्त्यापर्यंत घरंगळत गेल्या आणि जमिनीला पडलेल्या भेगांत नाहीशा झाल्या.

हव्या तितक्या उच्च स्वरापर्यंत आपल्याला पोचता येत नाही हे जाणवल्यावर आजोबांनी गाणे थांबवले. आपल्या पाण्याचा टब रिकामा झाला आहे हे त्यांच्या लक्षात आले. "आपण तर इतकं काही पाणी उडवलेलं नाही बुवा," ते मनाशी म्हणाले आणि तपेली शोधू लागले. पण त्यांना ती सापडेना. टबमधून उठू लागले तर सगळा टबच उठला आणि त्याने त्यांना मोरीत झालेल्या पाण्याच्या थारोळ्यात फेकले.

"भूत ! भूत !" आजोबा ओरडले. "इथं नक्कीच खोडकर भूत आलंय आणि टबाबरोबर क्रीडा करतंय."

त्यांनी आपलं अंग पुसायचा टॉवेल ओढला, घाईघाईने कमरेभोवती गुंडाळला आणि धाडकन दार उघडून ते न्हाणीघराच्या बाहेर धावले.

तोपर्यंत भूकंपाचा पहिला धक्का संपला होता.

राकेश शाळेच्या अर्ध्या वाटेवर होता. आपला ताबा झुगारून सायकल रस्त्यावर वेडीवाकडी वळणे घेत आहे हे त्याला प्रत्ययाला आले होते. नशीबाची खैर म्हणूनच नाही तर, तो एका बैलगाडीवर आदळणार होता.

सायकलची साखळी कुठे अडकली आहे का हे पाहायला तो सायकल-वरून खाली उतरला आणि त्याच्या लक्षात आले की सगळा रस्ताच सायकलप्रमाणे बेभरवशाचा झाला आहे. पण हे सारे काही सेकंदच घडले. मग सगळे पुन्हा स्थिर झाले. परंतु आश्चर्याची गोष्ट म्हणजे बैलगाडीचे बैल पुढे जायला तयार होईनात.

"तुला जाणवला ना ?" बैलगाडीवाला राकेशला म्हणाला.

"होय. सगळंच काही कापू लागलं होतं," राकेश म्हणाला. "हा भूकंपच ना ?"

"होय, छोटासाच," गाडीवाला म्हणाला. "किंवा पुढं होणाऱ्या मोठ्या भूकंपाची सुरवात."

राकेश सायकलवरून तसाच पुढे शाळेला गेला. शाळेची घंटा अजून व्हायची होती. आणि मुले-मुली शाळेभोवती घोळक्या घोळक्यांनी उभी राहून नुकताच बसलेल्या भूकंपाच्या धक्क्याबद्दल उत्तेजितपणे बोलत होती. भूकंपाचा दुसरा धक्का बसला तर विद्यार्थी शाळेच्या जुनाट इमारतीऐवजी बाहेरच

सुरक्षित असतील अशा विचाराने मुख्याध्यापक अजून शाळा भरल्याची घंटा वाजवत नव्हते, आणि या उशीरामुळे मुलामुलींना अधिकच मजा वाटत होती. तथापि पंधरा मिनिटे होऊनही पुढे काही घडले नाही तेव्हा आता शाळा भरवावी असे हेडमास्तरांना वाटले. पण मुलांनी नाराजी व्यक्त करून सुटीची मागणी केली. राकेश आपल्या वर्गाचा प्रतिनिधी होता.

"सर, गेल्या वर्षी छप्पर उडून गेलं तेव्हा तुम्ही सुटी जाहीर केली होती."

"पण यावेळी छप्पर अजून शाबूत आहे," हेडमास्तर म्हणाले.

"आणि समजा भिंती कोसळल्या तर ?"

"जेव्हा भिंती पडतील तेव्हा आपण सुटीचा विचार करू," हेडमास्तर उद्गारले. "आता आधी तुम्ही सगळे आपापल्या वर्गात जा पाहू."

"माझी आंघोळ नीट झाली नाही," आजोबा कुरकुरले. "टबमध्ये हवं तितकं पाणीच नव्हतं."

"तुम्हाला नाही जाणवला ?" आजीने त्यांना विचारले.

"काय जाणवायचंय ?"

"भूकंपाचा धक्का."

"थोडासुद्धा जाणवला नाही. तुलाच काहीतरी भास झाला असेल."

"अहो, सारी जेवायखायची चिनीमातीची भांडी फुटलीत. तुम्ही बर्मामधून आणलेलं भांडंसुद्धा फुटलंय. तुम्हाला आता केळीच्या पानावर जेवावं लागेल. किंवा डॉलीच्या खेळातल्या ताटल्यांवर."

"मुकेश आणि डॉली कुठं आहेत ?"

"डॉली पुन्हा जिन्याखाली गेलीय. ती तिची आवडती जागा आहे. मुकेश मुमताजच्या मोठ्या मुलाबरोबर बाहेर खेळतोय. भूकंपाच्या बसलेल्या धक्क्याचे त्यांना काही नाही. पण राकेशच्या शाळेचे काही नुकसान झाले नसले म्हणजे मिळवली."

"काय म्हणतेस ?... मला तर काही कळलंही नाही."

"आंघोळ करताना तुम्हाला काहीच लक्षात येत नाही— इतर सगळ्यांना मात्र तो जाणवलाय— अगदी कोंबड्यांना सुद्धा. त्यांना धक्काच बसलाय अन् आता बरेच दिवस त्या अंडी देणार नाहीत."

घराभोवती चक्कर मारताना भिंतींना गेलेले किती तरी तडे आजीला दिसले आणि तिने ते आजोबांना दाखवले.

"त्या पूर्वीच्याच चिरा आहेत," आजोबा उद्गारले. "कित्येक वर्षांपासून



त्या तशा आहेत."

"मला तरी बाई, त्या यापूर्वी कधी दिसल्या नाहीत. काही का असेना, आपण हे घर आता सोडायला हवं. हे उगीचच फार मोठं आहे आणि त्याची देखभाल करण्यात निष्कारणच खूप पैसे खर्च होतात."

"मग मला वाटतं आपण आपलं घर कलकत्त्यात करावं. पण मला नाही वाटत छोट्याशा फ्लॅटमध्ये राहायला तुला आवडेल म्हणून. आणि तुला गर्दीचीही सवय नाही."

"माझ्या डोक्यात भूकंपाचे धक्के न बसणारी दुसरी थंड हवेची ठिकाणं होती. आपण हे इथलं घर विकूया आणि दार्जिलिंग किंवा कॅलिपाँग अशा एखाद्या ठिकाणी जाऊ या."

"मग अजून एखादा धक्का बसू देऊ नकोस अशी देवाजवळ प्रार्थना कर," आजोबा म्हणाले. "कोसळलेली वास्तू काही कोणी खरेदी करणार नाही."

त्यांना मुकेशचा बागेत चाललेला आरडाओरडा ऐकू आला.

"हा आता त्याचा नेहमीचा खोडसाळपणा सुरू झालेला दिसतोय," असे कुरकुरत आजोबा कसला आवाज ते पाहायला बाहेर आले.

मुकेशला एक घरटे आणि हिरवळीवर पडलेली फुटकी अंडी सापडली होती. आणि चिडलेल्या मैनांचे जोडपे त्यांच्यावर हल्ला करू पाहत होते म्हणून तो ओरडत होता.

"तू त्या घरट्याला काय केलंस ?" आजोबांनी जाब विचारला.

"काहीच नाही," मुकेश म्हणाला. "सगळं काही हलत होतं तेव्हा हे घरटं झाडाच्या खाली पडलं."

"तसंच झालं असेल. पण तू त्या घरट्यापासून दूर हो; नाहीतर ते पक्षी तुझ्यावर हल्ला केल्याशिवाय राहणार नाहीत."

हा एवढा सगळा गोंधळ कोणी केला याचा शोध घेत पिकल इकडे तिकडे धावत होता. तो आणि शेजारचा कुत्रा आपापल्या घरांच्या पायऱ्यांवरून एकमेकांवर भुंकू लागले. बहुधा ते म्हणत होते : "माझं घर हलवायची तुझी एवढी हिंमत !" सरते शेवटी वादाचा कंटाळा येऊन पिकल उंदीर शोधण्याकरता कोठीत निघून गेला. उंदीर पकडण्यात तो खरोखरच तरबेज होता.

नुकत्याच जाणवलेल्या या धक्क्यांची गावभर चर्चा सुरू होती. विशेष गंभीर स्वरूपाचे नुकसान झाले नव्हते. त्यामुळे सगळ्यांच्याच दृष्टीने झाले ते सगळे गमतीचा भाग बनले होते. पण तीस वर्षांपूर्वीचा भूकंप आठवणीत असलेली काही जुनी माणसेही तिथे होती. आणि शेकडो बांधकामे भुईसपाट झाल्यामुळे मित्र, नातेवाईक, आणि घरे गमावून बसल्याची आठवण त्यांच्या मनात ताजी होती. भूकंपाचा पहिला धक्का सौम्य असला तर, त्यानंतर बसणारा दुसरा धक्का मोठा असतो याची त्यांना माहिती होती. आणि तसेच काही तरी यावेळी होणार नाही ना अशी त्यांना धास्ती वाटत होती. अफवांना तर ऊतच आला होता. तुरुंग जमीनदोस्त झाला आणि सगळे कैदी पळून गेले अशी बातमी होती. काही म्हणत होते की विराट ब्रह्मपुत्रेने आपले पात्र बदलून सारा आसाम जलमय करून सोडला आहे आणि सुसरी-मगरींनी गावां-खेडेगावांवर हल्ला चढवला आहे. काहींच्या सांगण्यावरून हिमालयाचे हिमकडेच्या हिमकडे खाली घसरू लागले होते. आणि काही तर म्हणत होते की पृथ्वीने तोंड उघडून सारेच्या सारे शिलाँग पोटात घेतले आहे म्हणून !

"जगाचा अंत जवळ येऊन ठेपला आहे," बाजारामधल्या साधूने जाहीर केले.

"साधू महाराज," एका दुकानदाराने विचारले, "आपण आता यावेळी काय करायला हवे ?"

"स्वतःला स्वच्छ आणि पवित्र करा," साधू म्हणाला. "स्वतःच्या आत्म्याबद्दल चिंतन करा."

"म्हणजे गिऱ्हाइकांना फसवू नका," एक विनोदवीर जाता जाता म्हणाला.

"तू आयुष्यात कधी पोटापुरते तरी पैसे मिळवले आहेस का ?" दुकानदार ओरडला. "तू मला अजूनही वीस रुपये देणं लागतोस !

इकडे बर्मनांच्या घरात सगळेजण शांतपणे दुपारचे जेवत होते. पण ती शांतता फार वेळ टिकली नाही. डॉलीला मुकेशला जे वाढले तेच नेमके हवे होते. खरे म्हणजे तिला आणि मुकेशला काहीही वेगवेगळे वाढलेले नव्हते. आणि तुला वाढलेले जेव पाहू असे तिला बजावताच तिने आकांडतांडव करायला सुरुवात केली.

"ही मुलं म्हणजे कहर आहेत !" आपला आमटीभात संपवत राकेश उद्गारला. "खरं म्हणजे यांनी शाळेत जायला हवं."



"शाळेत परत जायची तुझी स्वतःचीच वेळ झालीय," आजी म्हणाली. "दीड वाजलाय."

"आज आम्हाला दुपारची शाळा नाही आहे. आम्हाला भूकंपाची सुटी मिळाली नसली तरी आम्हाला आता क्रिकेटची मॅच पाहायचीय. इथल्या 'लेकक्लब'च्या संघाशी खेळण्याकरता म्हणून कलकत्याचा संघ इथं आलाय."

"मी तुझ्याबरोबर येणार," मुकेश म्हणाला.

"नाही. सायकलच्या मागे बसलास की तू नेहमी खाली पडतोस."

"मग मी पुढं बसतो."

"तू घरीच राहणार आहेस," आजी म्हणाली. "मागच्या वेळी तू फूटबॉलचा सामना पाहायला गेला होतास तेव्हा हरवला होतास."

"अग पण, ही क्रिकेटची मॅच आहे, "मुकेश म्हणाला. "क्रिकेटच्या सामन्याच्या वेळी कोणी हरवत नाही."



"तू माझ्याबरोबर बंगाली मिठाईच्या दुकानात येणार का ? आजोबा म्हणाले.

"हो, हो; येणार," मुकेश म्हणाला." क्रिकेटपेक्षा ते चांगलंच. आणि याच्या दळभद्री सायकलीपेक्षासुद्धा !"

"असे हे भूकंप का होतात ?" राकेशने विचारले.

"पृथ्वी फार जुन्यापुराण्या काळापासून अस्तित्वात आहे," आजोबा म्हणाले. "काही तरी लाखो वर्षांपासून आणि काही काही वेळा तिला आपल्या म्हातारपणाचा शीण येतो—"

"तुम्ही लाख वर्षांचे झाले आहात ?" मुकेशने विचारले.

"अजून तरी नाही," आजोबा म्हणाले. "पण कधी कधी पृथ्वीला माझ्याप्रमाणंच आपण आळस द्यावा, जांभई द्यावी असं वाटतं आणि मग तसं केल्यानं पृष्ठभागाला तडे जातात— त्यालाच आपण भूकंप म्हणतो."

"पण ती इथंच का आळस देते ?" राकेशने विचारले.

"तिला कुठंही आळस देता येतो आणि ती तशी वेगवेगळ्या ठिकाणी आळस देतेही, तोक्यो, सॅन फ्रॅन्सिस्को, इराण, दक्षिण पॅसिफिक, इटली, तुर्कस्थान — जगात असं कोणतंही ठिकाण नाही की जिथं कधी ना कधी तरी का होईना; पण भूकंप झालेलाच नाही. अर्थात काही ठिकाणी त्याचा जोर जास्ती असतो तर काही ठिकाणी कमी. आपलं हे ठिकाण पृथ्वीच्या आळस देण्याच्या अनेक ठिकाणांपैकी एक ठिकाण आहे एवढंच."

जेवण झाल्यावर राकेश सायकलवरून क्रिकेटच्या मैदानाकडे गेला. आजोबा आणि मुकेश बाजारात गेले. आणि डॉली आजीच्या पाठोपाठ धुणे वाळत घालायला अंगणात गेली. यानंतर साधारण दहा मिनिटांनी भूकंपाचा खरा धक्का बसला आणि निम्मे गाव भुईसपाट झाले.

क्रिकेटच्या मैदानापाशी राकेश जवळ जवळ पोचला होता तोच अकस्मात रस्ता वाकला आणि उभ्याने त्याच्या अंगावर आला. दुसऱ्याच क्षणी राकेश जमिनीवर फेकला गेला.

पृथ्वीच्या पोटातून खोलवरचा गडगडाट ऐकू येऊ लागला आणि मरणाची घटका जवळ आलेल्या प्रचंड सापाने उलथापालथ करावी त्याप्रमाणे रस्ता खालीवर होऊ लागला. जमिनीवर पडून राहण्यापेक्षा सायकलवर बसणे सोपे असे राकेशला वाटले.



क्रिकेटचा सामना नुकताच सुरू झाला होता तो एकदम थांबला. कारण खेळपट्टीत अचानक फार मोठा चर पडला आणि त्यात वेगवान गोलंदाज, पंच, आणि सिली मिडॉनला उभा असलेला क्षेत्ररक्षक पडले. त्यांची नंतर सुटका करण्यात आली हे खरे; पण भूकंपामुळे सामना सोडून देण्याची कोणत्याही ठिकाणची ती पहिलीच वेळ होती !

जे प्रत्यक्ष खेळत होते किंवा तलावाकाठच्या पॅव्हिल्यनमधून खेळ पाहात होते त्यांना एक प्रचंड गर्जना ऐकू आली. निम्मी टेकडी उफाळून तलावात पडल्याचा तो आवाज होता. झाडेझुडपे आणि शिळा यांच्यासह जमीन फुगली आणि कोसळली. त्याबरोबर धूळ आणि पाणी आकाशाकडे झेपावले. त्याच वेळी तलावाचा काठ एखाद्या लाटेसारखा वर उचलला गेला आणि त्यातले सगळे पाणी सभोवताली फेकले गेले. क्रिकेटचे खेळाडू आणि प्रेक्षक यांचे नशीबच चांगले होते म्हणून पाण्याचा हा लोंढा विरुद्ध दिशेने वाहू लागला. तरी जाताना त्याने गाडीतळावरच्या कितीतरी मोटारी, चरणारी गुरे, शेळ्या, तारेचे खांब आणि जुन्या तुरूंगाची भिंत आपल्याबरोबर नेली.

कैद्यांना ही पळून जायची सुसंधी होती. परंतु हे सगळे इतके अकस्मात घडले होते की त्या धक्क्यात जीव वाचवण्याकरता तुरुंगापाठीमागच्या टेकाडाकडे पळत जाण्यापलीकडे त्यांना दुसरे काही करता आले नाही. काहींना ते जमले नाही. आणि ते उलट्यापालट्या झालेल्या तलावाच्या पाण्याबरोबर वाहून गेले. जे वाचले ते टोळक्या टोळक्यांनी एकत्र होऊन आपल्या सुटकेची वाट पाहू लागले.

जमिनीवर पडल्या पडल्या ती प्रचंड लाट आपल्याकडे येताना राकेशला दिसली. तो तसाच उठला— त्यावेळी लाट त्याच्यापासून सुमारे पन्नास मीटर दूर होती. तो जवळच्या झाडाकडे धावला. सुदैवाने ते झाड म्हणजे अनेक पारंब्यांची मुळे होऊन भक्कम झालेला एक जुना, मोठा, आणि चढायला सोपा असा वटवृक्ष होता. जमेल तितके वर चढून राकेश खाली पाण्याच्या लाटांकडे पाहात होता. आपली सायकल त्या पाण्याबरोबर वाहत जाताना त्याला दिसली. त्यानंतर त्याला ती पुन्हा कधीही दिसली नाही.

आजोबा आणि मुकेश बाजारात मिठाई खात होते. त्या दोघांचा सर्वात आवडता पदार्थ म्हणजे गुलाबजाम. साहजिकच ते दोघे हलवायाच्या दुकानाशी उभे राहून गुलाबजामवरच ताव मारत होते.

साऱ्या बाजारात कमालीचा गजबजाट होता. परमोच्च रहदारीची ती घटका

होती. रस्ता गर्दीने भरलेला. बायका भाजी घेत होत्या. रस्त्याच्या बाजूला असणाऱ्या मोठ्या दुकानांशी स्पर्धा करत फूटपाथवर दुकाने थाटलेले चमकणाऱ्या पितळी भांड्यांपासून ते जुन्या कपड्या-पुस्तकापर्यंत विकण्यासाठी धडपडत होते. पादचाऱ्यांच्या त्या गर्दीतूनच मार्ग काढत सायकली, मोटारी, टांगे, गायी, कुत्री, आणि पोलिस-शिपाईही ये-जा करत होते.

मुकेशचे चार तर आजोबांचे सहा रसाळ गुलाबजाम मटकावून झाले होते तेव्हा त्यांच्या डोळ्यादेखत हलवायाचे दुकान झुलू लागले. मग दुकानाचे कापडी छत खाली कोसळले आणि त्याच्या खाली मिठाईसकट हलवाई बुडून गेला. साऱ्या रस्त्यावर घबराट पसरून सगळे लोक आरडाओरडा करत सैरावैरा पळू लागले होते. त्या आवाजात हलवायाच्या दबलेल्या हाका कोणाला ऐकूही गेल्या नाहीत.



आपण धडपडणाऱ्या हलवायाच्याच वर आहोत हे आजोबा आणि मुकेशला जाणवले. मुकेश धडपडत सावरला होता; पण पुन्हा छतात सापडला. त्यातून त्याला सोडवावेच लागले. आणि हे सगळे चालले असताना जमीन खालीवर होतच होती आणि हलणारी दुकाने पत्त्यांच्या बंगल्यांप्रमाणे कोसळून भुईसपाट होत होती.

काही सेकंदांच्या अवधीत सरळ बाजाराचे रूपांतर वाकड्यातिकड्या बाजारात झाले होते. रस्ता इतका वेडावाकडा झाला होता की नेहमी डाव्या बाजूला असणारी दुकाने आता उजव्या बाजूची झाली होती आणि उजव्या बाजूची दुकाने डाव्या बाजूची. गाडीवर बसून भीक मागणाऱ्या नेहमीच्या भिकाऱ्याला आजपर्यंत कोणीही चालताना पाहिले नव्हते. त्याने आता चटकन पायांवर उडी मारली होती आणि जिवाच्या आकांताने पळत तो नाहीसा झाला होता. गाई नाहीशा झाल्या होत्या आणि त्यांच्या बरोबरच पोलिसशिपाईसुद्धा. एक फटफटी जमिनीला पडलेल्या खोल खड्ड्यात पडून दिसेनाशी झाली होती. तर एक मोटार नगरभवनाच्या पायऱ्या चढली होती. एक टांग्याचा घोडा दौडत रस्त्याच्या मध्यभागी आला. पण त्याच्या पाठीमागच्या टांग्याचा किंवा टांगेवाल्याचा पत्ताच नव्हता.

खुद्द नगरभवनही कोसळले होते आणि त्यामुळे त्यात काम करणारे कितीतरी कारकून आणि अधिकारी त्याखाली गाडले गेले होते. दुसऱ्याही कितीतरी मोठ्या इमारती कोसळून भुईसपाट झाल्या होत्या.

आजोबा घाबरले नव्हते. मिठाईच्या ढिगाऱ्यावरच्या मुकेशला त्यांनी उचलले आणि पुरा गोंधळलेल्या हलवायाला पायांवर उभे केले. मग त्यांच्या लक्षात आले की या भूकंपाचा दणका गावाच्या सगळ्याच विभागांना बसलेला असणार.

''आपण आता घराकडं जाऊ या,'' ते म्हणाले.'' तिथं काय काय झालं असेल कोणास ठाऊक ?''

मुकेशचा हात पकडून ते रस्त्यावरून धावू लागले. त्यांना साथ देणे मुकेशला जड जात होते. आजोबांना पळताना तो पहिल्यांदाच पाहात होता.

धक्का बसला तेव्हा डॉली अंगणात धुणे वाळत घालायला आजीला मदत करत होती. त्या दोघी त्यावेळी घरात असल्या तर जिवंत काही बाहेर पडल्या नसत्या.



पहिल्या धक्क्याच्या वेळेप्रमाणे याही वेळी घडले. कुत्रा केकाटू लागला. सगळे पक्षी झाडांवरून उडाले आणि कलकलाट करत वरती गोलाकार फिरू लागले. मग एकदम झाडांमध्ये घुसून पुढे जाणारा वारा सुटला. आणि जमीन कापू लागली; खालीवर होऊ लागली.

डॉलीने वर पाहिले तर घराच्या छपरावरचे उंच धुराडे खाली कोसळत होते.

''अग आजी,'' ती किंचाळली, ''सारं घरच कोसळतंय. माझ्या बाहुलीच्या घराचं आता काय होईल ?''

''बाहुलीच्या घराचं राहू दे,'' आजी म्हणाली. ''आधी आपण या घरापासून दूर होऊ या.''

त्या बागेत धावल्या आणि जवळ जवळ त्याच वेळी घराच्या भिंती फुगल्या आणि छप्पर मध्ये कोसळले. सारे घरच खाली कोसळले आणि धूळ आणि गिलाव्याचे ढग वर उडाले.

आजीने रस्त्यापलीकडे पाहिले तर तेथली घरेही खाली कोसळत होती. जणू कोणी अदृश्य राक्षसच त्यांना फुंकर मारून खाली पाडत होता.

विचित्र शिटी मारत असल्याप्रमाणे वारा वेगाने वाहत होता. पण हे सगळे नुकसान वाऱ्यामुळे झाले नव्हते. त्याला जबाबदार होती थरथरणारी पृथ्वी. तिच्या कंपनामुळे विटा, गिलाव्याचे पोपडे, तुळया, आणि वासे सगळे काही सैल होऊन खाली पडले होते आणि हवा गुदमरवून टाकणाऱ्या धुळीने भरून गेली होती. त्यांना बोलताही येईना.

ही सगळीच घरे किती तकलादू असतात नाही, आजी मनात म्हणाली. जणू बाहुल्यांचीच घरे. आणि तरी त्यातली कितीतरी तिथे शंभर वर्षे टिकून राहिली होती. शंभर वर्षे— आणि एका क्षणात सारे काही होत्याचे नव्हते झालेले.

पृथ्वीची थरथर आता थांबली होती. पण त्या आधीच त्यांचे घर म्हणजे कोसळलेल्या विटा दगडांचा ढिगारा झाले होते. एका फुटलेल्या खिडकीतून पलंग डोकावत होता. चेंगरलेल्या सोफासेटवर एक मोटारीचा नळ उफाळून पाणी टाकत होता. इथे मोडलेल्या खुर्चीचा किंवा लिहिण्याच्या मेजाचा तुकडा तर तिथे फाटलेल्या सतरंजीचा तुकडा. ओळखीची हॅट, फाटलेली पुस्तके, वाकडी झालेली छत्री— इथे एके काळी घर उभे होते याची आठवण देणाऱ्या एवढ्याच खुणा.

शेळी कुठे दिसत नव्हती, कोंबड्या नाहीशा झाल्या होत्या. कोणतीही इजा न पोचलेली गोष्ट म्हणजे डॉली आणि आजीने वाळत घातलेले धुणे. ते तारेवर पक्के बसून वाऱ्यावर फडफडत होते.

वाऱ्याबरोबर वाहत आलेल्या दूरवरच्या आरडाओरडीचा आवाज त्यांच्या कानी पडत होता. फोडलेल्या किंकाळ्या, एकमेकांना मारलेल्या हाका, किंवा दुसरे काही करण्याजोगे शिल्लक नसल्यामुळे काही जणांनी केलेला नुसताच आकांत.

बागेच्या मध्यभागी आजी आणि डॉली पुतळ्यांप्रमाणे उभ्या होत्या. त्यांना एवढा मोठा धक्का बसला होता की त्यांना काही हालचालच करता येत नव्हती. तेवढ्यात त्यांना आजोबा आणि मुकेश रस्त्यावरून आपल्याकडे धावत येताना दिसले. त्याबरोबर त्या दोघीही धावू लागल्या.



पिकल कोठीच्या खोलीत अडकला होता. तो तेथे दोन मोठ्या पेट्यांआड लपलेल्या उंदराला बाहेर हुसकू पाहात होता. उंदराची अगदी घाबरगुंडी उडाली होती. तेवढ्यात वरचे छप्पर त्या पेट्यांवर कोसळले. सगळी कोठी धुळीने भरून गेली. इतकी की काही दिसेनासेच झाले. पिकलला हे मुळीच आवडले नाही. त्याला त्या गुदमरवून टाकणाऱ्या खोलीच्या बाहेर जायचे होते आणि आपल्या सुटकेची वाट पाहात तो तिथे नुसता बसूनही राहणार नव्हता. डॅकूशुंडचे उपजत गुण आणि उंदीर पकडण्यातला अनुभव आता त्याच्या कामी आला. तो तेथे गर्दी केलेल्या दगडाविटातून बाहेर पडण्याकरता पुढच्या पायांनी बोगदा तयार करू लागला.



# तीन

जी काही थोडी घरे अजूनही उभी होती त्यात मुमताजची झोपडी होती. लाकडी फळ्या आणि गवताचे छप्पर असल्यामुळे ती अतिशय हलकी आणि किरकोळ होती. इतकी की जोराच्या वाऱ्यानेसुद्धा ती उडून जाऊ शकली असती. पण तिने धरणीकंपाला योग्यप्रकारे तोंड दिले होते. विटा आणि गिलावा खाली कोसळत असताना तिचे लाकडाचे हलके बांधकाम पृथ्वीच्या हालचालीबरोबर नुसते हेलकावले किंवा कंप पावले होते आणि अजूनही उभे होते.

थोड्याच वेळात डॉली झोपडीतल्या मातीच्या गुळगुळीत जमिनीवर मुमताजच्या मुलाशी खेळण्यात रमून गेली. मुकेश अजून आजोबांना सोडायला तयार नव्हता. आणि आजी कमरेवर हात ठेवून कोसळलेल्या घराच्या अवशेषांकडे पाहात किती नुकसान झाले याचा अंदाज घेत उभी होती.

''राकेशचं काय झालं असेल कोणास ठाऊक,'' आजोबा म्हणाले. ''मुकेशकडं थोडा वेळ पाहतेस का ? म्हणजे मी जातो आणि राकेशला पाहतो.''

''होय, तसंच करा,'' आजी म्हणाली. ''मला त्याची काळजी वाटते. आणि एखादेवेळी भूकंपाचा अजूनही एखादा धक्का बसायचा.''

''तू इथं ठीक आहेस ना ?''

''होय. अजून अंगावर पडायला इथं काही शिल्लकच नाही. मुमताज म्हणतो की आज रात्री तुम्ही सगळे माझ्याच घरात झोपा. तीच सगळ्यात सुरक्षित जागा वाटते.''

''तू आणि मुलं तिथं झोपा. मी बाहेर उघड्यावर झोपेन. आत्ताच उकडायला लागलंय आणि पाऊस पडेल असं काही वाटत नाही.''

आजोबा राकेशला शोधायला गेले असताना आजी आणि मुमताजने अजून काही वापरता येणाऱ्या वस्तू सापडतायत का हे कोसळलेल्या घराच्या अवशेषांत पाहायला सुरवात केली. दुर्दैवाने त्यांच्या सर्व चीजवस्तू

दगडविटांच्या ढिगाऱ्याखाली खोल पुरल्या गेल्या होत्या आणि अजूनही वाचवाव्यात अशा वस्तूच शिल्लक राहिलेल्या दिसत नव्हत्या— मोडतोड झालेली ढकलगाडी, कपड्यांची एक पेटी, सार्डिनचे काही डबे, आणि आजोबांचा टाइपरायटर— जो एवीतेवी बंदच पडलेला होता— बस्, एवढ्याच गोष्टी. कोसळलेल्या वास्तूच्या ढिगाऱ्याच्या सर्वात तळाशी पिकल सापडला आहे याची त्यांना कल्पनाच नव्हती. तो कुठेतरी आजूबाजूला असेल, घडले ते कोणी घडवले याचा शोध घेत नेहमीप्रमाणे इकडे तिकडे पळत असेल असे त्यांना वाटले.

''माझ्या बाहुल्या कुठं आहेत ते शोधा,'' डॉली ओरडली. ''आणि बाहुलीचं घरसुद्धा.''

परंतु बाहुलीचे घर आता अस्तित्वातच नव्हते.

''आता खेळणी नाहीत,'' मुकेश समाधानपूर्वक म्हणाला. त्याला आता सर्वच बाबतीत आपण मोठे झालो आहोत असे वाटत होते. ''आता आपण गरीब झालोत.''

''बँकही कोसळलीय का ?'' डॉलीने विचारले.

''होय. नक्कीच,'' अनुभवी माणसासारखे मुकेश उद्‌गारला.

हवा स्वच्छ आणि कोरडी राहील या आजोबांच्या अनुमानाविरुद्ध जात पाऊस पडू लागला आणि मुमताजच्या छोट्याशा झोपडीत त्यांना आसरा घ्यावा लागला. त्याच्या त्या छोट्याशा जागेत फार खेचाखेच झाली होती; पण मुमताजने मोठ्या मनाने तिकडे दुर्लक्ष केले.

जितक्या वेगाने उभ्या झालेल्या तलावाच्या पाण्याचा आजुबाजूला पूर आला होता तितक्याच वेगाने तो ओसरलाही. झाडाच्या पानाफांद्यांमधून राकेशने शाळेच्या दिशेने पाहिले. किती वाजले हे त्याला बघायचे होते. तसे म्हणजे शाळेच्या इमारतीवरचा घड्याळाचा उंच मनोरा नेहमीच कितीतरी मैलांवरूनही दिसत असे. पण आता त्याचा ठावठिकाणाच नव्हता. खरे म्हणजे त्यांच्या आजुबाजूची इमारत कोसळली तेव्हापासूनच तो नाहीसा झाला होता.

वरून पडलेल्या तुळईमुळे हेडमास्तर अडकून पडले होते आणि त्यांच्या डेस्कभोवती पडलेल्या दगडमाती विटांच्या ढिगाऱ्यातून त्यांना बाहेर काढण्यासाठी अजूनही शर्थीने प्रयत्न सुरू होते. वर्गांची तर कत्तलच झाली. स्वैपाकघरात आग लागली होती आणि ती आजुबाजूला पसरू पाहात होती.



शाळा पुन्हा पूर्वीप्रमाणे सुरू व्हायला आता काही महिन्यांचा अवधी लागणार होता आणि त्यावेळी अनेकजण अनुपस्थित राहणार होते.

काही वेळानंतर राकेश झाडावरून खाली उतरला. आपली सायकल कुठे दिसते का हे पाहायला त्याने आजुबाजूला बघितले. पण ती कुठेच नव्हती. पाण्याबरोबर वाहत आलेल्या इतर अनेक गोष्टी झाडाच्या बुंध्यापाशी साचल्या होत्या. एक मेलेले मांजर, पाण्यात बुडून मेलेली कोंबडीची अनेक पिले, पाणी ओसरून गेल्याने तडफडणारे मासे आणि एका चित्रपटाच्या जाहिरातीचा भलामोठा फलकसुद्धा. त्याच्यावरचा मुंबईच्या एका प्रसिद्ध नटाचा चेहरा चिखलातून वर पाहत होता.

राकेशला दूरवर असणारा धुळीचा मोठा लोट दिसला. त्याला त्या वेळी कल्पना नव्हती पण पूर्ण किंवा अर्धवट कोसळलेल्या शेकडो इमारतीची ती धूळ होती. भूकंप झाला, फार मोठा भूकंप झाला, आणि त्याचा फार मोठ्या क्षेत्रावर परिणाम झाला असणार हे अर्थातच राकेशला कळले होते. आपले आजोबा, आजी, आणि भाऊ बहीण यांचे काय झाले असेल ? गावातून जाणाऱ्या रस्त्याची वाट धरत तो आपल्या घराच्या दिशेने पळू लागला.

गावामधल्या रस्त्याने पळताना हे आपलेच गाव आहे अशी त्याला खात्री नव्हती. कारण नेहमीच्या कितीतरी खाणाखुणा आता दिसत नव्हत्या. गावातले सर्वात मोठे आणि महागडे हॉटेल 'ग्रँड ईस्टर्न' खाली पडले होते. त्यात उतरलेले अनेक पाहुणे मृत्यू पावले होते. अंगणात एक अँबुलन्स गाडी उभी होती. आणि रस्त्याच्या पलीकडे आगीचा बंब लागलेल्या अनेक छोट्या छोट्या आगी विझवण्याच्या प्रयत्नात होता. दगड विटा बाजूला करणाऱ्या कामगारांना राकेश नकळत मदत करू लागला. पण विटा किंवा मोडलेले लाकडी सामान दूर करण्यापलीकडे त्याला तिथे अधिक काही करता येण्याजोगे नव्हते. मग त्याच्या लक्षात आले की आपले घरही याच अवस्थेत असेल. तो थबकला आणि एकेकाळच्या विलासी हॉटेलची ही भयानक अवस्था रोखून पाहू लागला. तेवढ्यात त्याला खांद्यावर हात जाणवला. त्याच्या शेजारी आजोबा उभे होते.

''तू ठीक आहेस ना रे बाळा ?''

राकेशने मान डोलावली. तथापि तो गोंधळून गेला होता.

''आणि घरचे सगळे ?'' त्याने विचारले.



"ते सगळे ठीक आहेत." आजोबांनी घराचा उल्लेख टाळला. "तू आता चल. तू करण्याजोगं इथं कोणतंच काम नाही. तुझी सायकल कुठं आहे ?"

"ती वाहून गेली. तलावातलं सारंच्या सारं पाणी बाहेर पडलं. मी झाडावर चढून बसलो."

ते दोघे मूकपणे घराची वाट चालू लागले. पण त्यांच्या आजुबाजूला सर्वत्र आरडाओरडा आणि गोंधळ होता.

आपले घर इतक्या पूर्णपणे भुईसपाट झाले असेल असे राकेशला वाटले नव्हते. संभ्रमीत होत तो नुसता त्याकडे डोळे विस्फारून पाहात राहिला.

"सगळंच गेलं," तो अखेरीला उद्गारला. "दुर्दैव — किती दुर्दैव."

"नाही," आजोबा म्हणाले. "आपण सुदैवी आहोत. आपण सगळे जिवंत आहोत, नाही का ?"



# चार

आपण स्वतःला सुदैवी म्हणालो ते चुकले की काय असे आजोबांना उशिरा रात्री वाटले. कारण तेव्हा भूकंपाचा अजून एक मोठा धक्का बसला आणि गरम हवेच्या फुग्याप्रमाणे मुमताजची झोपडी हेलकावू लागली. गावात अजून काही इमारती कोसळल्या.

आजोबांचे हवेबद्दलचेही भाकीत चुकीचे ठरले होते. पाऊस काही थांबत नव्हता आणि बाहेर अंगणात झोपायचा स्वतःचा बेतही त्यांना सोडून द्यावा लागला होता. इतर सगळे घराच्या ढिगाऱ्यातून वाचवलेले सतरंज्यांचे किंवा गाद्यांचे तुकडे जमिनीवर पसरून झोपडीत झोपले होते. अर्थातच तिथे गर्दी झाली होती. मुमताज, त्याची बायको, आणि चार लहान मुले यांनी निम्मी जागा व्यापली होती आणि उरलेल्या निम्म्या जागेत आजोबा आणि त्यांचे कुटुंबीय पडले होते. मुकेश आणि त्याच्याहून लहान मुले सोडली तर कोणालाच नीट झोप लागली नाही.

ढिगाऱ्याखालून वर येण्यात पिकलला अखेरीला मध्यरात्री यश आले. गिलाव्याच्या चुन्याने माखल्यामुळे तो सगळा पांढरा झाला होता आणि त्याच्या लांब कानांपैकी एक तुटायला आला होता. झोपडीच्या शेजारी बसून तो जवळ जवळ सारी रात्र मोठ्याने रडत होता. गावातील इतर ठिकाणची कुत्रीही त्या रडण्यात सामील झाली आणि अशा प्रकारे ती एक विलक्षण भेदरवणारी रात्र ठरली— जोराने वाहणारा वारा, पाऊस, कुत्र्यांचे रडणे सारेच एकदम आणि शिवाय अजून एखादा धक्का तर बसणार नाही ना ही मनातली भीती.

दगडविटांची मोठी घरे ज्या वेगाने कोसळली तशी झोपडी पडायची शक्यता दिसत नाही हे आजोबांच्या लक्षात आले होते. मग ती धक्क्याच्या वेळी किती का हेलकावे खाईना. तसेच म्हणायचे तर दगडविटांचे सगळेच बांधकाम कोसळून भुईसपाट झाले होते तर लाकडाचे बांधकाम, मग ते किती का तकलादू असेना, उभेच्या उभे राहिले होते. त्यांना ते त्यावेळी माहिती नव्हते एवढेच.

सगळा आसाम आणि बंगालचा काही भाग भूकंपाच्या तडाख्यात

सापडल्यामुळे एकंदर नुकसान किती झाले ते कळायला वेळ लागणार होता. एका ठिकाणी आगगाडी उलटी-पालटी झाली होती; तर दुसऱ्या ठिकाणी ती रूळावरून घसरली होती. महानद ब्रह्मपुत्रेने काठ तोडले होते आणि त्यामुळे अनेक शेतकरी पुरात वाहून गेले होते. एका छोट्या गावात भर बाजारात दोन हत्ती येऊन बसले आणि दुसरा दिवस उगवेपर्यंत ते उठलेच नाहीत. एक माणूस नशीबवान ठरला. त्याच्या घराच्या भिंती कोसळल्या तेव्हा एक माठ फुटून त्याच्यावर नाण्यांचा वर्षाव झाला. पण दुसऱ्या कोणालाच खजिना सापडला नाही.

पाऊस रात्रभर पडत होता. आणि भूकंपाचा मोठा धक्का संपला असला तरी छोटे छोटे धक्के पाच पाच मिनिटांच्या अंतराने बसतच राहिले. मोठ्या माणसांबरोबर राकेशही रात्रभर जागाच होता. शाळेची सगळी इमारत भुईसपाट



झाली असणार याची त्याला खात्री होती. तेव्हा आता काही महिने तरी शाळा असणार नव्हती. दुसऱ्याही अनेक गोष्टी असणार नव्हत्या.

आपल्या छोट्याशा प्रायमस स्टोवर चहा करण्याकरता मुमताज सकाळी लवकर उठला. आजोबा उठले आणि बाहेर गेले. पाऊस थांबला होता. उगवत्या लाल, प्रखर सूर्यामुळे आकाशालासुद्धा जखम झाल्यासारखे वाटले होते. अनेकांकरता तो एक लांब, कष्टी दिवस होता.

थोड्याच वेळात मुले उठली आणि घराभोवती खेळू लागली. आजीने सार्डिनचा डबा खोलला— बहुधा सार्डिनचे डबे भूकंप— प्रतिकारक्षम असावेत— आणि मुमताजच्या बायकोने चपात्या केल्या. सार्डिन मासा आणि चपात्या छानच, जोडी जमली होती. पिकललासुद्धा ते आवडले. त्याचे डोके धुवून आजीने त्याला मलमपट्टी केली होती आणि तो आता पुन्हा जवळ जवळ नेहमीसारखा झाला होता.

"आपण आता कुठं इथून दुसरीकडं जाणार आहोत का ?" चपातीमध्ये गुंडाळलेल्या सार्डिनचा घास घेत राकेशने विचारले.

"मला जायचं नाहीये," मुकेश म्हणाला.

"मुकेशला नेहमी इतरांच्या उलट करायचं असतं," राकेश म्हणाला. "डॉली तुझं काय ? तुला काय करायचंय ?"

"मला माझं बाहुलीचं घर खणून बाहेर काढायचंय." डॉली म्हणाली.

"आपण तुला दुसरं घर घेऊ," राकेश म्हणाला. "मी तुला घर तयार करून देईन."

"आपल्याला बहुधा कलकत्ताच ठरवावं लागेल," आजोबा म्हणाले. "तिथे शाळा आहेत. खूप शाळा आहेत."

"नको," राकेश म्हणाला. "आम्हाला इथंच आवडतं. शाळा पुन्हा सुरू होईल."

"पण आपल्याला आता घर नाहीये."

"आपल्याला ते पुन्हा बांधता येईल, नाही का ?"

"होय," मुकेश म्हणाला. "आपण ते पुन्हा बांधू या."

"पुन्हा बांधू या," डॉली म्हणाली, "पुन्हा बांधू या."

"बोलायला सोपं आहे," आजी म्हणाली. "पण घर बांधायला पैसे कुठून आणायचे ?"

''मग आपले बाबा कशाकरता आहेत ?'' राकेश म्हणाला. ''त्यांना नोकरी आहे. नवं घर बांधायला ते आपल्याला पैसे पाठवतील. त्याकरता तर वडील असतात.''

''होय, तो बहुधा पाठवील पैसे,'' सार्डिनचा दुसरा डबा खोलत आजी म्हणाली. ''त्याकरता तर मुलं असतात.''

आजोबा फाटकाशी उभे होते तेव्हा त्यांना त्यांचे मित्र आझाद रस्त्याने जाताना दिसले. आझाद सुतार होते आणि आता त्यांचा चेहरा पडलेला, एकदम पांढरा फटक वाटत होता. नेहमी ते थांबून थोडा वेळ गप्पा मारत. पण यावेळी नुसताच हात करून ते पुढे जाऊ लागले.

''आझाद, अरे एवढी कसली घाई आहे ?'' आजोबा म्हणाले. ''करायला वर्षसुद्धा पुरणार नाही इतकं काम तुझ्याकरता गावात पडलंय.''

''पण कशाकरता काम करायचं ? कोणाकरता ?'' न थांबता आझाद म्हणाले. ''माझी बायको आणि मुलगी सैनिकी इस्पितळात आहेत— तेवढंच एक शिल्लक आहे. आणि त्या जगतील की नाही याची खात्री नाही. माझं स्वतःचं घर नष्ट झालंय; त्यामुळं मी सुद्धा त्यांच्या तिथंच झोपतो.''

आणि त्यांच्याप्रमाणेच तीव्र दुःखाने झाकोळलेले इतरही अनेकजण होते. मुमताजने लांबच्या नात्यातली एक आठ वर्षांची मुलगी घरी आणली. तिच्या घराचे छप्पर कोसळले तेव्हा त्याखालीच तिचे आईवडील पुरेपूर गाडले गेले होते.

''ही एकटी काय करणार ?'' आजी म्हणाली.

''मी सांभाळणार आहे तिला,'' मुमताज म्हणाला. ''नाही तरी मला अजून एक मुलगी हवीच होती.''

''ते तसं सोपं नाही,'' आजी म्हणाली. ''तू त्यात आमचीही मदत घ्यायला हवी.''

''ही देवाचीच इच्छा आहे,'' मुमताज म्हणाला. ''त्यानं आपल्याला वाचवलंय. जे आपल्याइतके सुदैवी नाहीत त्यांची आपणच काळजी घ्यायला हवी.''

भूकंपाच्या धक्क्यातून वाचलेले बहुतेक सगळे गाव सोडून निघाले होते त्यावेळी आजोबा आणि कुटुंबियांनी आपले घर नव्याने उभारायचे ठरवले. ते सगळा ढिगारा दूर करणार होते ; त्यातले अजून उपयोगी पडेल ते वाचवणार होते; आणि मग शून्यातून पुन्हा सारे काही नव्याने उभारणार होते. फक्त यावेळी



आजोबांनी छोट्या विटा आणि लाकडाच्या कमी वजनाच्या चौकटी वापरायचे ठरवले होते. ''म्हणजे त्यामुळं पुन्हा भूकंप झालाच...,'' ते म्हणाले, तर जमिनीवर कोसळण्याऐवजी आपणही मुमताजच्या झोपडीसारखे नुसते हेलकावे खाऊ किंवा झोके घेऊ.''

''मला वाटतं,'' आजी म्हणाली, ''कोठल्याही अरिष्टातूनसुद्धा काहीतरी शिकण्यासारखं असतंच.''

फुटलेल्या भिंतीवरून पाहात एका शेजाऱ्याने विचारले, ''तुम्ही लोक इथून सोडून नाही जात आहात ?''

''नाही,'' आजोबा म्हणाले. ''आम्ही थांबतोय.''

''तज्ज्ञांच्या मते अजून पुन्हा भूकंप होणार आहे.''

''कोणाला माहिती ?''

''तुमचा तज्ज्ञांवर विश्वास नाही ?''

''त्यांनी या झालेल्या भूकंपाबद्दल आधी काही सांगितलं होतं का ?''

''खरं आहे,'' शेजारी म्हणाला. ''त्यांनी काही सांगितलं नव्हतं.''

''मग पळून जाण्यात काय अर्थ आहे ? तुम्ही कुठं चाललात ?''

''कटकला.''



"तज्ज्ञांच्या मते कटकला जोरात वादळ होणार आहे."

भयचकित होऊन शेजाऱ्याने आपले हात वर केले. आणि तो तेथून चालता झाला. तो विचार करत होता : कटक हे काही चांगले ठिकाण दिसत नाही. पण मग अरिष्ट टाळायचे असेल तर माणसाने कुठे जायचे असते ?

आजोबा आणि कुटुंबियांनी इतके दिवस राहिलो त्या ठिकाणीच राहून आल्या प्रसंगाला तोंड द्यायचे ठरवले होते. एखादेवेळी पुन्हा भूकंप होईलही. पण यावेळी ते सगळे त्याला तोंड द्यायच्या तयारीत असतील. आणि तोपर्यंत मनाला दिलासा देणाऱ्याही गोष्टी होत्या. मुकेश आणि डॉली यांची काही खेळणी आणि बाहुल्या सापडल्या होत्या. त्यांनी मार खाल्ला होता; पण या अजून ओळखू येण्याच्या स्थितीत होत्या. ढिगाऱ्याच्या तळाशी असलेली आजीची शेगडी जवळ जवळ जशीच्या तशी होती— बिस्किटे तयार होणार होती. आजोबांचा वाकडा तिकडा झालेला टिनचा टब सापडला होता आणि त्याला ठोकून ठोकून त्यांनी तो पूर्वीसारखा केला होता.

त्यांनी तो आंब्याच्या झाडाखाली ठेवला, तो गरम पाण्याने भरला, आणि दुपारच्या उन्हात आंघोळ केली. त्यावेळी साबण वगैरे काही नव्हते. पण पुदिन्याची कितीतरी रोपे बागेत होती. जमेल तितक्या उच्च स्वराने त्यांनी गायला सुरुवात केली आणि आपल्या पूर्वीच्या जागी आता परतू लागलेली पाखरे त्यामुळे दचकली आणि धाबरून पुन्हा लांब उडून गेली.



# वणवा



# एक

लाबवरच्या झाडांच्या रांगांच्या पाठीमागून वर जाणारा धूर रोमीने पाहिला त्यावेळी तो आपल्या सायकलवर बसायच्या बेतात होता.

"जंगल पेटलेलं दिसतंय," त्याचा वर्गमित्र प्रेम म्हणाला.

"पण ते लांब, पूर्वेच्या बाजूला," रोमी म्हणाला. "रस्त्याच्या जवळपास नाही."

"पण वारा जोरात वाहतोय," रस्त्यावरच्या गिरक्या घेणाऱ्या वाळक्या पानांकडे पाहात प्रेम म्हणाला.

तो मे महिन्यांचा मध्य होता आणि त्या आधी कित्येक आठवडे पाऊस पडला नव्हता. गवताचा रंग तपकिरी झाला होता आणि झाडांची पाने धुळीने माखली होती. संध्याकाळचे सहा वाजत आले होते तरी दोघांचेही सदरे घामाने भिजलेले होते.

"लवकरच रात्र पडेल," प्रेम म्हणाला. "तू आज माझ्या घरीच थांबतोस का ?"

"नको. आज रात्रीपर्यंत घरीच येईन असं मी बाबांना सांगितलंय. बाबांची प्रकृती तितकीशी बरी नाही. त्यांच्याकरता वैद्यांनी मला काही गोळ्या दिल्यात."

"मग तू लागलीच नीघ. जंगलातली आग पसरताना दिसतेय."

"अरे, ती अजून फार दूर आहे. जंगलातून जायला मला चाळीस मिनिटंच लागतात. अच्छा, प्रेम. उद्या भेटू."

रोमी सायकलवर बसला आणि गावाच्या मुख्य रस्त्यावरून कोंबड्या, कुत्री, आणि खेडूत यांना बाजूला सारत, वाट काढत जाऊ लागला.

"अरे ए ऽऽ, बघ की कुठं चाललायस ते," अंगावर येणाऱ्या सायकलच्या मार्गातून उडी मारून दूर होत एक गावकरी ओरडला. "हा रस्ता तुला तुझ्या मालकीचा वाटला की काय ?"

"अर्थात ! आहेच तो माझ्या मालकीचा !" हसत हसत रोमी ओरडला,

आणि पुढे गेला.

त्याचे स्वतःचे गाव इथून साधारण सात मैलांवर, जंगलाच्या पलीकडच्या बाजूला होते. पण त्याच्या गावात फक्त प्राथमिक शाळाच होती आणि तो



तर आता प्रशालेत होता. त्याच्या वडलांची उसाची शेती होती आणि ते तसे बऱ्यापैकी पैसेवाले होते. त्यांनी रोमीला नुकतीच नवी सायकल घेऊन दिली होती. रोमीला शाळेबद्दल फारसे कौतुक नव्हते. खरे म्हणजे तिला सुट्ट्या फार कमी असतात असेच त्याला वाटायचे. परंतु त्याला सायकलवरून लांबलचक फेरफटके मारायला आवडायचे. आणि त्याची आपल्या वर्गमित्रांशीही चांगली मैत्री होती.

वैद्याने त्याला वडलांकरता औषधाच्या गोळ्या दिल्या होत्या म्हणून, नाही तर तो त्या रात्री प्रेमच्या घरीच थांबला असता. त्याच्या वडलांची पाठ धरली होती आणि त्यावर उपाय म्हणून वैद्याने खास गावातल्याच काष्ठौषधीपासून तयार केलेल्या गोळ्या दिल्या होत्या. बाबांनी आपल्याला एवढी छान सायकल घेऊन दिली तर आपणही परतफेड म्हणून त्यांना आता या गोळ्या लवकरात लवकर नेऊन द्यायला हव्यात असे त्याला वाटत होते.

त्याने डोके खाली घातले आणि तो वेगाने गावाच्या बाहेर पडला. त्याच्या समोर लांबवर पेटलेल्या जंगलाचा धूर वर जात होता आणि आकाश लालभडक झाले होते.

## दोन

थोड्याच वेळात त्याने गाव बरेच मागे टाकले. आता थोडीशी चढण लागली होती आणि पाय जोराजोराने मारावे लागत होते. एकदा वर पोचले की मग रस्ता वळणावळणाने जंगलाच्या कडेपर्यंत उतरता होता.

रस्त्याचा हाच भाग रोमीला सगळ्यात आवडायचा. पाय मारायचे थांबवून तो आरामशीर बसला आणि त्याने सायकलला उतारावरून आपले आपण जाऊ दिले. थोड्याच वेळात वारा वेगाने वाहू लागला. वाऱ्यामुळे त्याचे केस चेहऱ्याभोवती तर सदरा पाठीमागे उडू लागला. रोमीला एकदम कंठ फुटला आणि तो गाऊ लागला.

गावातला एक कुत्रा मोठमोठ्याने भुंकत त्याच्या सायकलबरोबर धावू लागला. आपल्याशी शर्यत लावणाऱ्या त्या कुत्र्याला रोमीने ओरडून प्रोत्साहन दिले.

मग रस्ता सरळ झाला आणि रोमी पुन्हा पाय मारू लागला.

जंगल आलेले पाहताच कुत्रा आपोआप गावाकडे परत फिरला. त्याला त्या जंगलाची भीती वाटत होती.

धूर आता गडद झाला होता आणि जळणाऱ्या लाकडाचा वास येऊ लागला होता. पण समोरचा रस्ता मोकळा होता. रोमीने सायकल तशीच पुढे चालवली.

तो तसा खडबडीत, धुळीचा, आणि जंगलातून सरळ जाणारा रस्ता होता. उंच वाढलेली झाडे रस्त्याच्या दोन्ही बाजूंना होती आणि त्यांच्यामुळे मावळता सूर्यप्रकाश अडवला जात होता. तथापि उजव्या बाजूने पेटलेल्या जंगलाची पसरणारी आग रस्त्यावर उजेड पाडू लागली होती आणि वृक्षांच्या राक्षसी सावल्या रोमीसमोर वेड्यावाकड्या नाचत होत्या.

त्या रस्त्यावर नेहमी सहसा कोणीच नसायचे. पण यावेळी आगीला भिऊन घाईघाईने रस्ता ओलांडणाऱ्या जंगली प्राण्यांनी त्याला गर्दीचा बनवला होता.

रोमीला प्रथम दिसला तो ससा. तो सायकलच्या पुढून उड्या मारत आडवा पळत गेला. आणि त्याच्या पाठोपाठ अनेक ससे उड्या मारत पळत होते. मग मोठ्याने चित्कार करत पळणारी माकडांची टोळी रस्ता ओलांडून निघून गेली.

वणवा हा रस्ता काही ओलांडणार नाही आणि त्यामुळे ते सगळे प्राणी रस्त्याच्या या बाजूला सुरक्षित राहतील असे रोमीला वाटले.



पण आग जवळ येत होती आणि तो जोराने पाय मारत होता. अर्ध्या तासात तो जंगलाच्या बाहेर पडला असता.

तेवढ्यात रस्त्याच्या बाजूने एक तितर पक्ष्यांचा थवा एकदम वर उडाला आणि सायकलच्या विरुद्ध दिशेने रस्त्याच्या जवळून झपापत झपदिशी रोमीच्या तोंडावर आला. हे सगळे इतके अचानक झाले की रोमी सायकलवरून खाली पडला. तो उठला आणि कपडे साफसूफ करू लागला तेव्हा आपल्या गुडघ्यातून रक्त गळत आहे हे त्याच्या लक्षात आले. जखम काही फार खोल नव्हती. त्याने तिच्यातून अजून थोडे रक्त वाहू दिले. मग आपला हातरूमाल बाहेर काढला आणि गुडघ्याला घट्ट बांधला. आणि तो पुन्हा सायकलवर बसला.

त्याने आपला वेग थोडा कमी केला कारण रस्त्यालगतच्या झाडीतून सारखे पक्षी आणि प्राणी रस्त्यावर आडवे येत होते.

फक्त तितर पक्षीच असे नाही तर त्यांच्याहून छोटे पोपट, रानकावळे, घुबडे, दयाळ असे पक्षीही रस्ता ओलांडत होते. आणि सारे वातावरण त्यांच्या कलकलाटाने भरून गेले होते.

सगळेजणच पळू पाहात आहेत त्याअर्थी आग फारच मोठी दिसते, असे रोमीला वाटले. त्याला आता उजव्या बाजूच्या झाडांआडून येणाऱ्या ज्वाला दिसल्या. आणि वाळलेल्या पानांनी पेट घेतल्यावर होणारा तडतड आवाजही त्याच्या कानांवर पडत होता. गरम हवा त्याच्या तोंडावर येत होती. आणि अजूनही जळत असलेली किंवा जळून राख होत असणारी पाने त्याच्या जवळून मागे पडत होती.

हरणांच्या एका कळपाने आता रस्ता ओलांडायला सुरवात केली आणि शेवटचे हरीण जाईपर्यंत रोमीला थांबावे लागले. मग तो पुन्हा सायकलवर बसला आणि पुढे जाऊ लागला. पण आता पहिल्यांदाच त्याला भीती वाटू लागली होती.



# तीन

समोरून भांडी आपटल्याचा अस्पष्ट आवाज ऐकू येऊ लागला. हा कोणाही प्राण्याने केलेला आवाज नाही, याची रोमीला खात्री होती. आगीचा बंब तर नसेल ? पण कोणताही बंब पन्नास मैलांच्या आत नव्हता. तेव्हा तीही शक्यता नव्हती.

भांडी आपटल्याचा आवाज जवळ आला आणि रोमीला एक छोटा मुलगा रस्त्याने पळताना दिसला. त्याच्या हातात दुधाच्या दोन बरण्या होत्या आणि त्या एकमेकींवर आपटून आवाज होत होता.

तो जवळच्याच गावातला तेजू आहे हे रोमीने ओळखले.

''तेजू, तू इथं काय करतोयस ?'' रोमी म्हणाला.

सायकलच्या शेजारून धापा टाकत पळणाऱ्या तेजूने उत्तर दिले, ''मी घरी निघालोय.''

रोमीने त्याच्याकरता सायकल थांबवली आणि म्हटले, ''मार उडी.''

तेजू रोमीपेक्षा एक-दोन वर्षांनी लहान म्हणजे आठ-नऊ वर्षांचा होता. रस्त्यावरच्या कामगारांना दूध द्यायला म्हणून तो आला. पण जंगल पेटल्याच्या पहिल्या खुणा दिसताच ते कामगार तेथून निघून गेले होते. आणि दुधाने भरलेल्या बरण्यांसकट तेजू घाईघाईने घरी निघाला होता.

तो सायकलच्या आडव्या दांडीवर चढून बसला आणि रोमी पुन्हा पाय मारू लागला. आपल्या मित्रांना असे डबलसीट न्यायची त्याला चांगली सवय होती.

''तुझ्या दुधाच्या बरण्या आपटत राहा,'' रोमी म्हणाला. ''म्हणजे आपण येतोय हे प्राण्यांना कळेल. माझ्या सायकलच्या घंटेचा आवाज फारच बारीक आहे. मी आता सायकलवर मोटारीसारखा मोठा भोंगा बसवून घेणार आहे.''

''जंगलात इतके प्राणी असतात हे मला यापूर्वी माहितीच नव्हतं,'' तेजू म्हणाला. ''रस्त्याच्या मध्यभागी एक अजगर मला दिसलं. ते रस्त्याच्या या बाजूकडून त्या बाजूपर्यंत आडवं पसरलं होतं.''



"मग तू काय केलंस ?"

"मी पळतच राहिलो आणि त्याच्यावरून उडी मारली."

तेजूने आपली बडबड चालू ठेवली. पण रोमीचे डोके आगीच्या विचाराने भरले होते. ती आता खूपच जवळ आली होती. वाळलेल्या गवतातून ज्वाला निघत होत्या आणि झाडांच्या बुंध्यांवर किंवा फांद्यांवर चढत होत्या. जंगलाच्या वर धूर ओसंडत होता.

रोमीचे डोळे आता चुरचुरू लागले. केस आणि भुवया जळल्यासारख्या वाटू लागल्या. त्याला दमल्यासारखेही वाटत होते. पण त्याला आता थांबता



येणार नव्हते. त्याला आग ओलांडून पलीकडे जायचे होते. जंगल आणि उसाची शेते यांना जोडणारा नदीवरचा एक छोटासा लाकडी पूल होता. अजून दहा-पंधरा मिनिटे सायकल चालवत राहिले तर त्याला त्या पुलापाशी पोचता येणार होते.

एकदा नदी ओलांडली की ते दोघे सुरक्षित असणार होते. नदीच्या अलीकडच्या काठावर जंगल संपत होते. त्यामुळे पलीकडच्या काठावर आग पोचू शकणार नव्हती. परंतु ते त्या नदीपाशी वेळेत पोचणार होते का ?



# चार

टण, टण, टण; तेजूच्या दुधाच्या बरण्या वाजत होत्या. परंतु वणव्याचे आवाजही आता मोठ्याने येऊ लागले होते.

एका उंच झाडाने पेट घेतला होता. त्याच्या फांद्या रस्त्यावर वाकल्या होत्या. ते झाड कोसळले तेव्हा ते दोघे जवळ जवळ त्याच्या खालीच होते आणि त्यांच्या पुढेच फक्त काही पावलांवर जळणारी फांदी रस्त्यावर आडवी पडली.

सायकलवरून उतरून रस्ता सोडून जाण्यापलीकडे आता उपाय नव्हता. डाव्या बाजूच्या काटेरी झुडुपांच्या गुंतागुंतीतून मार्ग काढत काढत, सायकल ढकलत, ओढत ते दोघे जळणाऱ्या झाडांपासून थोड्या अंतरावर पुन्हा रस्त्यावर आले.

"आपण आता आगीच्या तावडीतून सुटत नाही," सायकलच्या दांडीवर चढता चढता हताशपणे तेजू म्हणाला.

"आपण नक्की बाहेर पडू," जिवापाड पाय मारत रोमी म्हणाला. "आगीनं अजून रस्ता ओलांडलेला नाही."

तो हे बोलत होता तेवढ्यातच एक छोटीशी ज्वाला डाव्या बाजूच्या गवतातून उठताना त्याला दिसली. अशाच तऱ्हेने ठिणग्या आणि पेटलेली पाने उडून डाव्या बाजूचे गवत पेटायला आता फार वेळ लागणार नव्हता.


"अरे, बापरे !" सायकल एकदम थांबवत रोमी ओरडला.

"आता काय झालं ?" दुखणारे डोळे पुसत तेजू म्हणाला. आणि मग धुरातून पलीकडे पाहिल्यावर तिथे काय घडले आहे ते त्याला कळले.

रस्त्याच्या मध्यभागी एक हत्ती उभा होता.

तेजू दांडीवरून घसरला. त्याच्या दुधाच्या बरण्या खाली घरंगळल्या आणि त्यातले दूध बाहेर सांडले.


हत्ती त्यांच्यापासून साधारण चाळीस फूट दूर होता. तो अस्वस्थ होता; त्याचे मोठे कान उघडझाप करत होते आणि डोके इकडे तिकडे हलवून आता



कोठल्या दिशेने जावे याचा तो अवस्थपणे विचार करत होता.

अजूनही आगीचा स्पर्श न झालेल्या डाव्या बाजूच्या जंगलातून एक हत्तींचा कळप नदीकडे निघाला होता. कळपाच्या प्रमुखाने आपली सोंड वर करून मोठ्याने आरोळी ठोकली. ती ऐकून रस्त्यावरच्या हत्तीनेही सोंड वर करून आरोळीनेच उत्तर दिले. मग तो हलला. कळपाच्या दिशेने सावकाश चालत चालत तो जंगलात शिरला आणि रस्ता मोकळा झाला.

''चल, चल, तेजू. आधी उडी मारून बैस,'' रोमी उद्गारला. ''आपल्याला थांबायला वेळ नाही.''



## पाच

रस्त्यावर पडलेल्या आपल्या दुधाच्या बरण्यांना विसरून तेजू पटकन दांडीवर बसला. वेग येण्यासाठी सायकलला धरून रोमी थोडा धावला आणि मग धावता धावताच चटदिशी सायकलवर बसला. शक्य तितके रस्त्याच्या डाव्या बाजूला राहून तो उजव्या बाजूच्या ज्वाला, पडणाऱ्या फांद्या, धूर, आणि तप्त आग यांपासून लांब राहत होता.

ज्यांना सुटका करून घेणे शक्य होते ते सगळे प्राणी आता निघून गेले होते. कारण त्यांचे रस्ता ओलांडणे आता थांबले होते.

''आता आपण थांबणार नाही,'' दातओठ खात सायकल चालवत रोमी म्हणाला. ''मग हत्ती का मध्ये येईना.''

''आपल्याला आता थोडंच जायचंय,'' तेजू म्हणाला. तो आता पुन्हा उत्साही झाला होता.

उष्णता आणि धूर यांमुळे मेलेला किंवा बेशुद्ध झालेला एक कोल्हा रस्त्यावर पडला होता. पण रोमी थांबला नाही. त्याने पटकन वळण घेत सायकल त्या प्राण्याच्या कडेने चालवली आणि मग सारे सर्वस्व पणाला लावून त्याने पाय मारले.

शेवटचे शंभर यार्ड त्याने सगळ्यात वेगाने पाठीमागे टाकले आणि मग ते जंगलाच्या बाहेर आले आणि उताराच्या रस्त्याने नदीकडे जाऊ लागले.

''अरे, बघ !'' तेजू ओरडला. ''पूलही पेटलाय !''

जळणारा फुफाटा वाहत वाहत छोट्याशा लाकडी पुलाजवळ आला होता आणि त्याच्यातला विस्तव आणि उडणाऱ्या ठिणग्या यांमुळे पुलाच्या वाळक्या, जुन्या लाकडाने चटकन पेट घेतला होता. आणि आता तेथे मोठी आग लागली होती.

रोमी थांबला नाही. त्याने रस्ता सोडला आणि वाळू आणि खड्यांतून

वेगाने सायकल चालवली. आणि ते नदीच्या काठावरून घसरत एकदम पाण्यातच पडले.

पुढच्याच क्षणी ते पाण्यात हातपाय मारत अंधारात एकमेकाला शोधू लागले.

''रोमी, मी बुडतोय,'' तेजू ओरडला.



## सहा

''मूर्खपणा करू नकोस,'' रोमी म्हणाला. ''पाणी खोल नाही आहे— ते गुडघ्यापर्यंतच आहे. इकडं ये आणि मला पकड.''

पाणी उडवत तेजू आला आणि त्याने रोमीच्या पट्ट्याला धरले.

''पाणी किती गार आहे !'' दात वाजवत तेजू म्हणाला.

''तुला परत जाऊन ऊब मिळवायचीय का ?'' रोमीने विचारले. ''काही जणांचं कधीच समाधान होत नाही. चल, इकडं माझ्या मदतीला ये. आपल्याला सायकल उचलायचीय. ती आपण उभे आहोत तिथंच खाली आहे.''

दोघांनी मिळून पाण्यातून सायकल वर उचलली आणि पुन्हा उभी केली.

''आता हिच्यावर बैस,'' रोमी म्हणाला. ''मी तुला ढकलत नेतो.

''आपण वाहून जाऊ,'' तेजू म्हणाला.

''नाही. या दिवसात नदीला फारसं पाणी नसतं. पण मध्यभागी प्रवाह मात्र जोरात असतो. तेव्हा गप्प बसून राहा. कळलं ?''

''होय,'' तेजू घाबरत म्हणाला.

एक हात बसायच्या सीटवर आणि एक पुढच्या हँडलवर ठेवून रोमी सायकलला नदीपलीकडे नेऊ लागला. उन्हाळा असल्याने नदीला पाणी फार नव्हते आणि त्याला फारसा वेगही नव्हता. पण मध्यभागी ते वेगानेच वाहत होते. पण वणव्याच्या आगीतून यशस्वीपणे बाहेर पडलेला रोमी आता एवढ्याशा नदीकडून हरायला तयार नव्हता.

त्याने आपले जोडे काढले. ते आता आपल्याला परत मिळणार नाहीत हे त्याला माहिती होते. मग नदीच्या तळाशी असलेल्या गुळगुळीत दगडांवर चवडे घट्ट रूतवत आणि स्वतःचा तोल सावरत सावरत तो सायकल आणि तिच्यावर बसलेला तेजू यांना नदीच्या मध्य प्रवाहातून पलीकडे नेऊ लागला. पाणी इथे कमरेपर्यंत खोल होते आणि तेजूच्या मानाने प्रवाहही खूपच जोरात होता. पण पुन्हा उथळ पाणी आले आणि तेव्हा तेजूही खाली उतरला आणि रोमीच्या बरोबरीने सायकल ढकलू लागला.

ते दुसऱ्या काठाला पोचले आणि तिथल्या गवतावर कोसळले.

"आता आपल्याला विश्रांती घेता येईल," रोमी म्हणाला. "पण रात्रभर नाही. मला बाबांना औषध नेऊन द्यायचंय." त्याने खिशात चाचपून पाहिले आणि औषधाच्या गोळ्यांचा लगदा झाल्याचे त्याच्या लक्षात आले. "ठीक आहे," तो म्हणाला." नाहीतरी त्या त्यांना पाण्याबरोबरच घ्यायच्या होत्या."

अरण्यात अजूनही पसरत चाललेल्या वणव्याकडे ते पाहात राहिले. ते ज्या रस्त्यावरून आले होते तो रस्ता आता आगीने वेढला होता. आकाश लाल झाले होते आणि त्याचे लाल प्रतिबिंब नदीत पडले होते.

कितीतरी हत्ती नदीला पोचले होते. सोंडेने एकमेकांवर पाणी उडवत ते एकमेकांची गारव्याची गरज पुरी करत होते. तसेच प्रवाहाच्या खालच्या बाजूला हरणे आणि इतर प्राणी होते.

वणव्याच्या उजेडात रोमी आणि तेजू यांनी एकमेकांकडे पाहिले. त्यांची आधी एवढी ओळख नव्हती. पण आता त्यांना आपली कित्येक वर्षांपासूनची मैत्री असल्यासारखे वाटत होते.

"तू कसला विचार करतोयस ?" तेजू म्हणाला.

"आग एक-दोन दिवसात विझली तरी पूल काही एवढ्यात बांधून होणार नाही," रोमी म्हणाला. "मी त्याचाच विचार करतोय. बहुधा माझ्या शाळेला आता खूप दिवसांची सुटी मिळणार !"

"पण तू पाण्यातून नदी ओलांडू शकशील," तेजू म्हणाला. "आत्ताच नाही का तू ती तशी ओलांडलीस ?"

"शक्यच नाही." रोमी म्हणाला. "ती फार वेगाने वाहतेय."

Printed at Jupiter Offset Works, Shahdra, Delhi-110032